स्मार्ट PCMC SMART CITY

# महाईन्यूज™

epaper.mahaenews.com

ePaper

। सोमवार ।
दि. 13 एप्रिल 2026 ।

पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती



**PRIYADARSHANI SCHOOL & JR. COLLEGE**
MOSHI

## 43 YEARS OF NURTURING VALUES, EXCELLENCE AND TOMORROW'S LEADERS.



## ADMISSIONS OPEN 2026-27

Nursery to Grade 5

### WHY CHOOSE PRIYADARSHANI SCHOOL?

43 Years of Excellence in Education | Advanced Robotics & Computer Labs Experienced and Dedicated Faculty | Multiple Sports Grounds for All-Round Development Proven 100% Results in Grade X | A Perfect Blend of Tradition and Innovation

+91 9890613333 | +91 9373073077

pgosm05@gmail.com www.priyadarshanischoolmoshi.in

# पावसाळ्यापूर्वी नालेसफाईचे काम पूर्ण करा

## स्वच्छ सर्वेक्षण २०२६ च्या अनुषंगाने आरोग्य विभागाची सविस्तर आढावा बैठक

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**आगामी पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर शहरातील सर्व नालेसफाईची कामे वेळेत, नियोजनबद्ध आणि गुणवत्तापूर्ण पद्धतीने पूर्ण करण्याच्या स्पष्ट निर्देश आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिले. नाल्यांवरील तसेच शहरातील अनधिकृत बांधकामे, अडथळे निर्माण करणारी आस्थापने यांच्यावर कडक कारवाई करावी, असे देखील त्यांनी सांगितले.**



पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मुख्य प्रशासकीय इमारतीमध्ये दिवंगत महापौर मधुकरराव पवळे सभागृहात नुकतीच आरोग्य विभागाची आढावा बैठक आयुक्त डॉ. सूर्यवंशी यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. यावेळी ते बोलत होते.

या बैठकीस अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे, तृप्ती सांडभोर, विक्रांत बगाडे, सह आयुक्त मनोज लोणकर, मुख्य अभियंता संजय कुलकर्णी, प्रमोद ओंबासे, सह शहर अभियंता बापू गायकवाड, आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. लक्ष्मण गोफणे, सह अभियंता बापू गायकवाड, अनिल भालसाखळे, उप आयुक्त डॉ. प्रदीप ठेंगल, सचिन पवार, अण्णा बोदडे, पंकज पाटील, व्यंकटेश दुर्वास, सीताराम बहुरे, नगर सचिव मुकेश कोळप, सहायक आयुक्त तानाजी नरळे, अमित पंडित, किरणकुमार मोरे, क्षेत्रीय अधिकारी अजिंक्य येळे, राजाराम सलगर, निवेदिता घार्गे, पूजा दूधनाळे, अतुल पाटील, राजाराम सलगर, किशोर ननवरे, मुख्य उद्यान अधीक्षक महेश गारगोटे यांच्यासह महापालिका अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

स्वच्छ सर्वेक्षण २०२६ च्या अनुषंगाने करण्यात आलेल्या विविध कामांचा आणि उपक्रमांचा सविस्तर आढावा यावेळी घेण्यात आला.

आयुक्त डॉ. सूर्यवंशी म्हणाले, पावसाळ्यात पाणी साचणे, नाले तुंबणे किंवा पूरस्थिती निर्माण होणे टाळण्यासाठी सर्व यंत्रणांनी अधिक सजग आणि सक्षम राहणे आवश्यक आहे. नालेसफाईची कामे केवळ पूर्ण करणे नव्हे, तर ती गुणवत्तापूर्ण पद्धतीने आणि वेळेत पूर्ण होणे अत्यंत महत्त्वाचे आहे. सर्व विभागांनी समन्वयाने काम करून नागरिकांना दिलासा देणे हे प्राथमिक उद्दिष्ट असावे, असेही त्यांनी अधोरेखित केले.

नाल्यांच्या प्रवाहात अडथळा निर्माण करणाऱ्या अनधिकृत बांधकामांमुळे शहरात पाणी साचण्याची समस्या गंभीर बनते. त्यामुळे अशा बांधकामांवर कोणतीही दया दाखवली जाणार नाही, असे स्पष्ट करत आयुक्त डॉ. सूर्यवंशी यांनी संबंधित विभागांना तातडीने कारवाई करण्याचे निर्देश दिले. त्याचबरोबर अनधिकृत नळजोड, ओव्हरहेड वायर, पदपथावरील अतिक्रमण, शहर विद्रूप करणारे होर्डिंग, बॅनर व जाहिराती यांच्यावरही कठोर कारवाई करण्याचे संकेत त्यांनी दिले.

बैठकीत पावसाळ्यातील आपत्ती व्यवस्थापन, तसेच उन्हाळ्यात नागरिकांना आवश्यक असलेल्या आरोग्य सुविधांची उपलब्धता यांचा सुद्धा सखोल आढावा घेण्यात आला. विविध विभागांमध्ये समन्वय साधून संभाव्य संकटांना सामोरे जाण्यासाठी पूर्वतयारी करण्याचे निर्देश देण्यात आले. आरोग्य विभागाने सादर केलेल्या माहितीनुसार, शहरातील एकूण १४५ नाले आणि सुमारे ९४ हजार ९१३ मीटर लांबीच्या नाल्यांची साफसफाई सुरू आहे. यापैकी आतापर्यंत ४७.३४ टक्के काम पूर्ण झाले असून मार्च महिन्याच्या तुलनेत प्रगतीत लक्षणीय वाढ झालेली आहे.

### ‘शून्य कचरा’ प्रकल्पाचे विशेष कौतुक

क्षेत्रीय कार्यालयनिहाय आढावा घेतल्यास ‘ई’ क्षेत्रीय कार्यालयाने ६४.३८ टक्के प्रगती साधत आघाडी घेतली आहे. त्याखालोखाल ‘ब’ क्षेत्रीय कार्यालयाने ६३.०० टक्के, ‘फ’ ने ५४.७२ टक्के आणि ‘अ’ क्षेत्रीय कार्यालयाने ५१.५० टक्के प्रगती साधली आहे. ‘ग’ (४४.११%), ‘ड’ (३९.५५%), ‘ह’ (३२.७२%) आणि ‘क’ (२८.७५%) क्षेत्रीय कार्यालयांमध्येही कामाला गती देण्यात येत असून उर्वरित कामे लवकर पूर्ण करण्यासाठी विशेष प्रयत्न सुरू आहेत. यावेळी स्वच्छ सर्वेक्षण २०२६ अंतर्गत राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांचाही आढावा घेण्यात आला. झिरो वेस्ट स्लम, झिरो वेस्ट स्कूल, आर.आर. आर. सेंटर या उपक्रमांद्वारे शहर अधिक स्वच्छ आणि पर्यावरणपूरक करण्याचा प्रयत्न सुरू असल्याची माहिती देण्यात आली. आनंदनगर येथील ‘शून्य कचरा’ प्रकल्पाचे विशेष कौतुक करत, अशा उपक्रमांचा विस्तार शहरातील इतर भागांमध्येही करण्याचे निर्देश आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी दिले. नागरिकांचा सहभाग वाढवून स्वच्छतेच्या उपक्रमांना अधिक बळ देण्यावरही त्यांनी भर दिला.

# संत साई शाळेत पालक रत्न पुरस्कार वितरण समारंभ सोहळा उत्साहात

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**संत साई इंग्लिश मीडियम स्कूलतर्फे, “पालक रत्न पुरस्काराचे वितरण समारंभ” उत्साहात पार पडला. या कार्यक्रमाचे मुख्य उद्दिष्ट पालकांनी विद्यार्थ्यांच्या शिक्षणात दिलेल्या सहकार्याचा आणि योगदानाचा सन्मान करणे हे होते.**



कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलनाने झाली. यावेळी मान्यवर पाहुणे डॉ. अशोकजी नगरकर (निवृत्त वरिष्ठ वैज्ञानिक, DRDO, पुणे) , श्री. सचिनभैय्या लांडे (माजी युनियन लीडर, टाटा मोटर्स, सामाजिक कार्यकर्ता), तसेच शाळेचे संस्थापक व मुख्याध्यापक श्री. शिवलिंग ढवळेश्वर सर, अजित जगताप सर, शाळेच्या ट्रस्टी पायल ढवळेश्वर मॅडम, उपमुख्याध्यापिका रूपाली खोल्लम मॅडम, दुपार विभागाच्या इन्चार्ज स्वाती मोघे मॅडम, पालक शिक्षक संघाचे सदस्य उपस्थित होते.

यानंतर सर्व शिक्षकांनी एकत्रितपणे पुत्र कल्याण प्रार्थना सादर केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ. श्वेता नारायणगांवकर यांनी केले.

कार्यक्रमात पालकांचा स्मृतिचिन्ह व प्रशस्तीपत्र देऊन सन्मान करण्यात आला. मुख्याध्यापक, मान्यवर पाहुणे आणि शिक्षकांच्या हस्ते पालक व विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात आला. पुरस्काराचे स्वरूप असे होते, NURSERY,L.KG,U.KG च्या पालकांना ‘NURTURING PARENTS’, 1ST TO 4TH च्या पालकांना ‘SUPPORTIVE PARENTS’ ,5TH TO 7TH च्या पालकांना ‘COMMITTED PARENTS, 8TH आणि 9TH च्या पालकांना DEVOTED PARENTS या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले यावेळी शाळेच्या उपक्रमांबद्दल आणि संस्कारांबद्दल माहिती देण्यात आली.मुख्याध्यापकांच्या भाषणात त्यांनी पालक आणि शाळा यांच्यातील सहकार्याचे महत्त्व अधोरेखित केले. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी योग, प्राणायाम आणि जीवनमूल्य शिक्षणाची गरज त्यांनी सांगितली.

हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मनोज वाबळे सर, रिया पोतदार मॅडम, मालन लिगाडे मॅडम, सुहासिनी बदोले मॅडम, कोमल वाबळे मॅडम, संजय अनार्थे सर, अक्षय राणे सर ,प्रमोद शिंदे सर यांचे मोलाचे सहकार्य लाभले. या कार्यक्रमामुळे पालक व शाळा यांच्यातील नाते अधिक दृढ झाले. कार्यक्रमाचा समारोप राष्ट्रकल्याण प्रार्थना आणि सौ. श्वेता नारायणगांवकर यांनी दिलेल्या आभार प्रदर्शनाने झाला.

### पुरस्कारामुळे अनेक पालकांना प्रेरणा

श्री. सचिनभैय्या लांडगे यांनी या पुरस्कारामुळे अनेक पालकांना प्रेरणा मिळेल असे सांगितले . पुढे त्यांनी आपल्या भाषणात संस्कृती, साजरे होणारे सण-उत्सव आणि मूल्याधारित शिक्षण यावर भर दिला. डॉ. अशोकजी नागरकर यांनी विद्यार्थ्यांना विज्ञान क्षेत्रात प्रगती करण्यासाठी प्रेरित केले. त्यांनी डॉ. होमी भाभा यांच्यासारख्या महान शास्त्रज्ञांचे उदाहरण देत विद्यार्थ्यांना प्रकल्प आणि उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग घेण्याचे आवाहन केले.डॉ. अजित जगताप सर यांनी पालकांना आपली संस्कृती जपण्यासोबत आपल्या पाल्याच्या वेशभूषाची विशेष काळजी घेण्याचे आव्हान केले. तसेच काही पालकांनीही आपल्या भावना व्यक्त केल्या.

# HR Symposium 2026: Inspiring the Next Generation of Industry-Ready Professionals

MAHAENEWS
|PIMPRI-CHINCHWAD

**The future belongs to those who continuously learn, adapt, and evolve." — a thought that resonated strongly throughout the HR Symposium 2026, held on 10th April 2026 at DY Patil International University, Akurdi!**




Centered around the theme "Future-Ready Engineers: Skills, Attitude, and Industry Expectations," the symposium brought together distinguished industry leaders and academic visionaries to guide students as they prepare to step into the professional world.

The event was inaugurated with an inspiring address by Honourable Vice Chancellor, Prof. (Dr.) Manish Bhalla, who emphasized the need for a global outlook, continuous skilling, and the right mindset to succeed in an ever-evolving industry landscape. His message set the tone for a session focused not just on careers, but on building future-ready individuals.

Addressing the students, Dean Placement, Ms. Jasmita Kaur highlighted that we are living in an era of rapid technological disruption, where engineers must go beyond technical knowledge and evolve into adaptable problem solvers. She emphasized that the industry today seeks professionals who are agile, collaborative, and committed to continuous learning. She further mentioned that DYPIU is actively working towards bridging the gap between academia and industry through practical and skill-based initiatives. Encouraging students to take ownership of their growth, she advised them to stay curious, build relevant skills, and become truly future-ready professionals.

Addressing the students, Prof. Dr. Arun Sacher, Associate Dean-Corporate Relations & Placement, stated that as per the Future of Jobs Report 2025, nearly 170 million new jobs are expected to be created by 2030, while around 92 million may be displaced, highlighting the need for adaptability and continuous reskilling. He mentioned that roles in AI, big data, and software development are among the fastest-growing, making technological and analytical skills increasingly important. Referring to the India Skills Report 2025, he noted that graduate employability has risen to nearly 55%, with strong demand for engineering, management, and AI-related skills, particularly in states like Maharashtra. He further emphasized the importance of continuous learning, internships, and the development of both technical and soft skills to remain competitive. He concluded by encouraging students to take initiative, keep progressing, and actively work towards building their careers.

The highlight of the symposium was an engaging panel discussion featuring eminent industry experts who shared practical insights and real-world perspectives. They also reflected on the institution's strong commitment to bridging the gap between academia and industry, creating meaningful opportunities for student growth.

Mr. Girish Khilari highlighted the importance of innovation and a problem-solving mindset in the era of digital transformation, encouraging students to think beyond conventional learning.

Mr. Umesh Ganjale offered valuable guidance on fresher hiring, stressing that adaptability and communication skills are as critical as technical knowledge.

Mr. Vaibhav Abdeo provided clarity on what recruiters truly look for, emphasizing the importance of positioning oneself effectively in a competitive job market.

Mr. Hardik Patel inspired students with his journey, underscoring the role of innovation and continuous learning in building impactful careers.

Mr. Pritesh Shah spoke about leadership, global exposure, and the need to develop a long-term professional vision.

Mr. Abhijit Puri further enriched the discussion with insights into evolving talent acquisition trends and industry expectations.

The session, seamlessly moderated by Mr. Chetan Khairnar, was interactive, thought-provoking, and deeply engaging, leaving students with not just information, but direction.

More than just a symposium, the event served as a reality check and a roadmap—reminding students that success lies in a blend of skills, attitude, and the willingness to grow continuously. An impressive turnout of 560 students enthusiastically participated in the HR Symposium, reflecting their keen interest and commitment towards becoming future-ready professionals.

As the session concluded, one message stood clear: being degree-ready is not enough—one must be industry-ready.

## Objectives of the Event

- To bridge the gap between academia and industry expectations
- To make students aware of current hiring trends and skill requirements
- To guide students on becoming industry-ready professionals
- To provide insights into emerging technologies and career opportunities
- To encourage continuous learning, adaptability, and professional growth
- To create a platform for direct interaction with industry leaders

Key Learnings for Students

- Importance of technical skills combined with soft skills
- Need for continuous upskilling and adaptability in a dynamic job market
- Understanding of recruitment processes and employer expectations
- Significance of communication, confidence, and professional attitude
- Exposure to real-world industry challenges and solutions
- Awareness of emerging trends like AI, digital transformation, and global operations
- Importance of building a strong professional profile and long-term career vision

# महात्मा फुले यांचे विचार आजही मार्गदर्शक

## महात्मा फुले यांच्या विचारांवर आधारित समाजव्यवस्थेचा परिसंवादातून उहापोह

**महाईन्यूज ।**
पिंपरी-चिंचवड

**समता, शिक्षण आणि सामाजिक न्याय यांचा विचार समाजात रुजविण्यासाठी क्रांतिसूर्य महात्मा जोतीराव फुले यांनी आयुष्यभर कार्य केले. स्त्रीशिक्षणाची मुहूर्तमेढ रोवणे, जातिभेद व अंधश्रद्धेविरुद्ध लढा देणे आणि वंचित घटकांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणणे या त्यांच्या कार्यातून समताधिष्ठित समाजव्यवस्थेचा पाया घातला.**




महात्मा फुले यांचे विचार आजही समाजाच्या विकासासाठी मार्गदर्शक असल्याचे मत 'महात्मा फुले यांना अभिप्रेत समाजव्यवस्था' या विषयावर आयोजित तज्ज्ञांच्या परिसंवादात व्यक्त करण्यात आले. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने क्रांतिसूर्य महात्मा जोतीराव फुले यांच्या द्विशताब्दी जयंती वर्षानिमित्त तसेच भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त आयोजित सामाजिक समता सप्ताह व विचार प्रबोधन पर्व २०२६ अंतर्गत 'महात्मा फुले यांना अभिप्रेत समाजव्यवस्था' या विषयावर परिसंवादाचे आयोजन करण्यात आले होते.

या परिसंवादात ज्येष्ठ पत्रकार विजय चोरमारे, अनुसूचित जाती जमाती आयोग, महाराष्ट्र राज्याचे सदस्य ॲड. गोरक्ष लोखंडे, ॲड. मनीषा महाजन, संविधान अभ्यासक नुरखा पठाण तसेच सर्वोच्च न्यायालय, दिल्ली येथील ॲड. दिशा वाडेकर यांनी सहभाग घेतला.

यावेळी शहर सुधारणा समिती सभापती संजय काटे, शिक्षण समिती सभापती रविना आंगोळकर, नगरसदस्या अनुराधा गोरखे, सुजाता बोराटे, अर्चना सस्ते, नगरसदस्य कुणाल वाव्हळकर, बाबा त्रिभुवन, माजी नगरसदस्य मारुती भापकर तसेच उप आयुक्त अण्णा बोदडे, विशेष अधिकारी किरण गायकवाड आदी उपस्थित होते.

ज्येष्ठ पत्रकार विजय चोरमारे म्हणाले, "महात्मा फुले यांनी समाजात समता आणि शिक्षणाचा जो दीप प्रज्वलित केला, तो आजही मार्गदर्शक ठरत आहे. फुले यांच्या विचारांचा प्रसार करून समाज अधिक संवेदनशील आणि जागरूक बनविणे गरजेचे असून यासाठी माध्यमांची भूमिका महत्त्वाची आहे.'

ॲड. गोरक्ष लोखंडे म्हणाले, 'महात्मा फुले यांच्या विचारांप्रमाणे शिक्षण, जागरूकता आणि संघटित प्रयत्नांमधूनच सामाजिक परिवर्तन साध्य होऊ शकते. महिलांना शिक्षण आणि संधी उपलब्ध करून दिल्यास समाज अधिक सक्षम होईल. तसेच सामाजिक विषमता दूर करण्यासाठी सर्वांनी संवेदनशीलतेने आणि जबाबदारीने काम करणे आवश्यक आहे.'

ॲड. मनीषा महाजन म्हणाल्या, 'महात्मा फुले यांनी मांडलेल्या वैज्ञानिक दृष्टिकोनाची आज अधिक गरज आहे. अंधश्रद्धा, चुकीच्या समजुती आणि परंपरांच्या नावाखाली होणाऱ्या अन्यायाविरोधात ठामपणे उभे राहणे आवश्यक आहे.

### जोतिबांची सावली, सावित्री माऊली

सामाजिक समता सप्ताह व विचार प्रबोधन पर्व २०२६ मध्ये पहिल्या दिवशी सायंकाळच्या सत्रात 'क्रांतिसूर्याला सलाम' या प्रबोधनात्मक गीतगायन कार्यक्रमात कव्वाल फैजान ताज यांनी आपल्या प्रभावी सादरीकरणातून महात्मा फुले व भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्याचा आणि विचारांचा सुरेल आविष्कार घडविला. सामाजिक समता, शिक्षण आणि मानवतेचा संदेश गीतांच्या माध्यमातून प्रेक्षकांपर्यंत पोहोचवत उपस्थितांची दाद मिळवली. तसेच तेजांकुर बहुउद्देशीय संस्था, अमरावती प्रस्तुत दोन अंकी ऐतिहासिक नाटक 'जोतिबांची सावली...सावित्री माऊली...' याचेही प्रभावी सादरीकरण करण्यात आले.

# महापालिकेतील चुकीच्या कामांवर अंकूश हीच भाजपाची कार्यप्रणाली!

**महाईन्यूज ।** पिंपरी-चिंचवड

**पिंपरी-चिंचवड महापालिकेतील तब्बल ५२ कोटी रुपयांची बिले लेखा विभागातील अधिकाऱ्यांनी चुकीच्या पद्धतीने अदा केली. यामध्ये ठकेदार किंवा नगरसेवक यांचा दोष नाही, तर संबंधित अधिकाऱ्यांने अधिकारांचा गैरवापर केला आहे. त्यावर भाजपाच्या महापालिकेतील पदाधिकाऱ्यांनी आक्रमक भूमिका घेत पर्दाफाश केला. पिंपरी-चिंचवडकरांनी विश्वासाने सलग दुसऱ्यांदा भारतीय जनता पार्टीला सत्ता स्थापनेची संधी दिली. त्यामुळे शहरवासीयांच्या विश्वासाला आम्ही कदापि तडा जावू देणार नाही. "चुकीच्या कामांना अंकूश हीच भाजपाची कार्यप्रणाली आहे" अशी भूमिका भाजपा शहराध्यक्ष तथा नगरसेवक शत्रुघ्न काटे यांनी मांडली.**



> महापालिकेतील विविध ठेकेदारांनी ५२ कोटी रुपयांची बिलांसंदर्भात उपसूचनांवर नगरसेवकांच्या स्वाक्षरी घेवून नियमबाह्यपणे बिल अदायगी केल्याप्रकरणी महापालिकेचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी प्रवीण जैन यांना सक्तीच्या रजेवर पाठवले आहे. विधी व कायदा विभागानेही अभिप्राय नोंदवला आहे. महापालिकेत सत्ता स्थापन केल्यानंतर भाजपाने अर्थसंकल्पामध्ये असलेल्या त्रूटी दूर करण्याची भूमिका घेतली. त्यानंतर आता लेखा विभागाच्या चुकीच्या कामाला प्रतिबंध करण्यात आला. पिंपरी-चिंचवडकरांनी दिलेली जबाबदारी सक्षमपणे आणि पारदर्शी कारभार या भावनेतून आम्ही पार पाडत आहोत.
>
> – शत्रुघ्न काटे, शहराध्यक्ष तथा नगरसेवक, भाजपा, पिंपरी-चिंचवड, पुणे.

पिंपरी-चिंचवड महापालिकेमधील तब्बल ५२ कोटी रुपयांच्या आर्थिक प्रकरणामुळे मोठी खळबळ उडाली. स्थायी समिती सभापती अभिषेक बारणे यांनी यावर प्रकाश टाकला आणि कारवाईची मागणी केली. मुख्य लेखा व वित्त अधिकारी प्रवीण जैन यांनी याबाबत प्रसारमाध्यमांना माहिती देवून दिशाभूल करण्याचा प्रयत्न केला. मात्र, महापालिका विधी व कायदा विभागाने सदरबाबत लेखी अभिप्राय नोंदवला आहे. "लेखा विभागाकडून अदायगी केलेली बिलांना स्थायी समिती आणि मुख्य सभेची मान्यता घेणे बंधनकारक आहे." असा अभिप्राय आला. त्यामुळे जैन यांच्या चुकीच्या कामांचा पर्दाफाश झाला.

दरम्यान, राष्ट्रवादी काँग्रेस आणि शिवसेनेच्या नगरसेवकांनी पत्रकार परिषद घेतली आणि ५२ कोटी रुपयांच्या बिलांबाबत चुकीच्या उपसूचनांवर केवळ भाजपाच्या नगरसेवकांच्या स्वाक्षरी आहेत. त्यामध्ये आमच्या नगरसेवकांचा संबंध नाही, अशी भूमिका मांडली. त्याद्वारे या प्रकरणाला राजकीय वळण देण्याचा प्रयत्न केला जात आहे. वास्तविक, काही बिलांच्या उपसूचनांवर राष्ट्रवादीच्या नगरसेवकांच्याही सूचक-अनुमोदक म्हणून स्वाक्षरी आहेत. मग, त्याची जबाबदारी संबंधित नगरसेवकांची आहे, अशी भूमिका मांडणे उचित नाही. त्यामुळे या प्रकरणात राजकीय उद्देशाने वातावरण निर्मिती करु नये, असे आवाहनही शहराध्यक्ष शत्रुघ्न काटे यांनी केले आहे.